दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३६ वा शुक्रवार दि.०८ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# जातीपातीचा विचार न करता ना.संजय बनसोडे यांना पाठींबा द्या : सचिन साठे यांचे आवाहन

## जनतेचे मालक नाही तर जनतेचे सेवक म्हणून काम करणारे ना.संजय बनसोडे यांना निवडून द्या

उदगीर/ प्रतिनिधी :– निवडणूक आली की काही लोकांना जात आठवते, इतर वेळी मात्र जातीला वाऱ्यावर सोडून देतात अशा लोकांना थारा न देता सर्वधर्म समभावाचा विचार जोपासून खऱ्या अर्थाने फुले,शाहु, आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांचे विचार आत्मसात करुन सामान्य माणसाच्या विकासासाठी झटणाऱ्या ना. संजय बनसोडे यांना जातीपतींचा विचार न करता खंबीर पाठिंबा द्या असे आवाहन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांनी केले. ते उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ गावभेट दौरा निमित्त उदगीर तालुक्यातील नळगीर येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते. माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर, भरत चामले, धर्मपाल नादरगे, शिवशंकर धुप्पे, प्रविण भोळे, अमोल निडवदे, हणमंत हंडरगुळे, रमेश शेरीकर, बाळासाहेब मरलापल्ले, हणमंत शेळके, चंद्रशेखर गव्हाणे, बालाजी देमगुंडे, गणेश गायकवाड, उदयसिंह ठाकुर, अजित





राठोड, रामदास बेंबडे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सचिन साठे यांनी, मागच्या सरकारने मातंग समाजासाठी कुठलाही भरीव निधी दिला नाही मात्र महायुती सरकारने वाटेगाव येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य – दिव्य स्मारकासाठी २५ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला. मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी आर्टीची स्थापणा केली.साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळाला भरीव निधी दिला. ना.बनसोडे यांनी उदगीर शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह अभ्यासिकेसाठी पंधरा कोटी तर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून देऊन समाज बांधवांच्या हितासाठी निर्णय घेतला. त्यामुळे आपल्या समाजाची काळजी घेणाऱ्या महायुतीच्या सरकारला जपले पाहिजे. महायुती सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करताना सर्व जाती धर्माला न्याय देण्याचे काम ना.संजय बनसोडे यांनी करुन या मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम त्यांनी केले आहेत. विरोधक नामदार बनसोडे यांच्या बद्दल काहीही बोलले तरी या भागातील जनता अतिशय सुज्ञ असून विकासाच्या पाठीमागे ते खंबीरपणे उभे टाकते असा विश्वास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातु सचिन साठे यांनी व्यक्त केला. गेल्या पाच वर्षात सर्वसामान्य जनतेच्या सुख दुःखात सामील होवुन व आपल्या कुटुंबासारखे मतदारसंघातील जनतेवर प्रेम करणारे लोकप्रतिनिधी म्हणून राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांची संपूर्ण महाराष्ट्रभरात ओळख आहे. आपल्या जनतेसाठी संपुर्ण सुख, सुविधा उपलब्ध करुन झपाटल्यागत काम करणारे ना.बनसोडे हे जनतेचे मालक नाही तर जनतेचे सेवक म्हणून काम करणारे आहेत त्यांनाच प्रचंड मतांनी निवडून द्यावे असे आवाहन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातु सचिन साठे यांनी व्यक्त केले. यावेळी नळगीर गावातून ना.संजय बनसोडे यांची भव्य मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात काढण्यात आली. यावेळी नळगीर सर्कलमधील विविध गावचे सरपंच, चेअरमन, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शांतता, सुरक्षीतता व सामाजिक एकोपा ही लातूरची खरी ओळख

लातूर / प्रतिनीधी :– शांतता, सुरक्षीतता व सामाजिक एकोपा ही लातूरची खरी ओळख आहे, ती जपण्याचा आम्ही सातत्यांने प्रयत्न केला आहे. त्यामुळेच लातूर विकासाच्या महामार्गावर गतीमाप पध्दतीने पूढे जात आहे. जातीय आणि धामिक व्देष पसरविणाऱ्या येथे थारा दिली जात नाही. राज्यातही असेच वातावरण रहावे म्हणून जाती धर्मात भांडणे लावणारे तसेच महापुरुषा बददल अनुदगार काढून समाजात व्देष पसरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरोधात कठोर कार्यवाही करण्या संदर्भात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास आम्ही कायदा करणार असल्याचे, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बुधवारी सांयकाळी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ७, ८, ९ च्या संयुक्त स्नेह बैठकीत बोलतांना सांगीतले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी खासदार सुधाकर श्रंगारे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीचे सरचिटणीस मोईजभाई शेख, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर–जिल्हाध्यक्ष राजा मणियार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगराध्यक्ष सुनील बसपुरे, विक्रात गाजमगुंडे, अशोक गोविंदपूरकर, लक्ष्मण कांबळे, नगरसेवक सपना किसवे, अतिश चिकटे, पृथ्वीराज सिरसाठ, संभाजी सुळ, फारुख शेख आदींसह कार्यकर्ते, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते. यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, संकटामध्ये कॉंग्रेस मदत करते, दुष्काळात मदत करते, कोविड काळात कॉंग्रेस मदत करते, आपल्या घरासमोरील रस्ता, नालेसफाई, कचरा संबंधित समस्या असली तर कॉंग्रेस मदत करते आणि आम्हाला तुम्ही विचारता कॉंग्रेस काय करते, असा थेट सवाल विरोधकांना करत माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरची जी प्रगती झाली ती कॉंग्रेसने आखलेल्या धोरणांमुळेच झाल्याचे ठामपणे सांगितले. भाजपने लातूरला फक्त आश्वासने दिले. एकाही आश्वासनाची पूर्तता त्यांना करता आली नाही. या निवडणुकीमध्ये जनतेने भाजपला जाब विचारला पाहिजे की,




लातूरसाठी तुम्ही काय केले, असे रोखठोक मत आमदार अमित देशमुख यांनी केले. ते पुढे म्हणाले, महायुती सरकारमध्ये भ्रष्टाचार बोकाळला आहे. त्याला सामान्य माणसे कंटाळलेली आहेत. महायुती सरकारचा पाया भ्रष्टाचारावर रचलेला आहे. महागाई, विजेचे दर महायुती सरकारने वाढवलेले आहेत. करामध्ये भरमसाठ वाढ केलेली आहे. कायदा सुव्यवस्था ढासळलेली आहे. नुसत्या घोषणा करायच्या, अंमलबजावणी करायची नाही. सर्वधर्मसमभाव जोपासण्याचे काम महाविकास आघाडीने केले तेरा अल्पसंख्यांक समाजाच्या नेत्यांना महाराष्ट्र विधानसभेमध्ये उमेदवारी देण्याचे काम महाविकास आघाडीने केले आहे. सर्वधर्मसमभाव जोपासण्याचे काम महाविकास आघाडीने केले आहे. महाराष्ट्राला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण एकत्रित आलो आहोत. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर लातूरचे स्थान महाविकास आघाडी सरकारमध्ये बलवान राहील. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे ईव्हीएम मशीनवर क्रमांक एकचे नाव अमित विलासराव देशमुख आहे. नावासमोरील हाताच्या चिन्हासमोरील बटन दाबून आपण मला बहुमताने निवडून द्यावे, माझ्या पाठीशी आशीर्वाद उभे करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महापुरुषांबद्दल अपशब्द बोलणाऱ्यां विरोधात कडक कायदा करणार लातूरमध्ये आपण गुण्यागोविंदाने नांदतो, नोकरी करतो, व्यवसाय करतो. गेल्या ५० वर्षांमध्ये एकाही लातूरकरांच्या केसाला धक्का लागू दिला नाही, म्हणून आपल्याला महाविकास आघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहायचे आहे. महायुती सरकारमधील मुख्यमंत्री यांच्याबद्दल कोणी बोलले, कोणत्या मंत्र्याबद्दल सोशल मीडियावर पोस्ट केली तरी त्याच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली जाते. पण कोणत्याही धर्माच्याविरोधात कोणी असे बोलले तर त्यांना मोकळे सोडले जाते. कॉंग्रेसचे सरकार असते तर कदाचित असे झाले नसते. शहर शांत ठेवणाऱ्या नेतृत्त्वाला लातूरकरांनी जपावं डॉ. शिवाजी काळगे लातूर शहर महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधील एक चांगले शहर म्हणून नावारूपाला आलेले आहे. शैक्षणिकदृष्ट्या उत्तुंग भरारी लातूरने घेतली आहे. हे सर्व पाहत असताना या सर्व करण्यामध्ये पडद्याच्या मागे, समोरून सर्व बाजूने सर्व गोष्टींना संरक्षण देण्याचे काम आपले नेते करत असतात. कुठल्याही शहरांमध्ये जेव्हा शांतता असते. तेव्हा उद्योगधंदे वाढीला लागतात. तेव्हा ते श्रेय तिथल्या वातावरणाला, राजकीय संस्कृतीला, नेतृत्वाला दिले गेले पाहिजे आणि म्हणून आपल्या सर्वांना ही संस्कृती जपायची आहे. आपल्याला हे नेते जपायचे आहेत. येणाऱ्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या पाठीमागे उभे राहायचे आहे, असे आवाहन लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनीकेले. लातूरचा कायापालट विलासराव देशमुख साहेबांनी केला माजी खासदार सुधाकर शृंगारे लातूर जिल्ह्यामध्ये ब्रॉडगेज रेल्वेचे रूपांतर करण्याचे काम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, रेल्वे स्टेशन शहरातून बाहेर नेण्याचे काम, एमआयडीसी वसवण्याचे काम, लातूरला वैभव मिळवून देण्याचे काम, संपूर्ण जिल्ह्याचा कायापालट करण्याचे काम आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनी केले. आदरणीय अमित देशमुख यांच्यामध्ये मी विलासराव देशमुख साहेबांना पाहतो. विलासराव साहेबांसारखे नेतृत्व अमित देशमुख करू शकतात, असे माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी म्हटले.

# शेतकरी संघटनेचा ना. संजय बनसोडे यांना जाहीर पाठिंबा



उदगीर / प्रतिनिधी :– स्वाभिमानी शेतकरी संघटना व शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना या दोन्ही शेतकरी संघटनेने उदगीर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचेचे अध्यक्ष प्रकाश रोडगे व शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे अध्यक्ष वीरेंद्र हाडोळे यांनी महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांना जाहीर पाठिंबा दिला असुन दोन्ही शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी रोडगे व हाडोळे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे उदगीरचे अध्यक्ष अरविंद गिलचे उपस्थित होते. यावेळी ना. संजय बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

# वंचितचे उमेदवार विनोद खटके यांना कुरैशी समाजाचा एकमुखी पाठिंबा विनोद खटके यांना निवडून आणण्याचा केला निर्धार

लातूर : जमियतुल कुरैश लातूर शहर कमिटी आणि सबंध कुरेशी समाजाने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद भाऊ खटके यांना पाठिंबा देऊन खटके यांना निवडून आणण्याचा संकल्प केला. कुरेशी समाजाच्या वतीने बुधवारी रात्री कुरेशी मोहल्ला येथे सभा वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोदभाऊ खटके यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेण्यात आली. खटके यांनी आपणास निवडून दिल्यास कुरेशी समाजाच्या सर्वांगीन







विकासाठी आपण कटिबद्ध राहू. असे आश्वासन दिले. तर वंचित बहूजन आघाडीचे स्टार प्रचारक ऍड. सर्वजीत बनसोडे यांनी विनोद खटके यांना निवडून देणे का गरजेचे आहे, दलित मुस्लिमांची मतांवर आमदार, मंत्री झाले मात्र त्यांच्या अडचणीबद्दल, विकाससाकडे दुर्लक्ष केले. असे मत त्यांनी आपल्या भाषणात कॉंग्रेसचे आमदार अमित देशमुख यांच्यावर टीका केली.

यावेळी कुरेशी समाजाच्या वतीने विनोदभाऊ खटके यांचा सत्कार करण्यात आला. आम्ही तुमच्या सोबत आहोत असा विश्वास देऊन यावेळी आम्ही तुम्हालाच निवडून आणू गॅस सिलेंडरलाच मतदान करू असा निर्धार यावेळी सबंध खुरेशी समाज बांधवांनी या सभेमध्ये केला. यावेळी कुरेशी मोहल्ला व अशोक नगरचे नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सलीमभाई सय्यद, शहराध्यक्ष सचिन गायकवाड, शफी महंमद, जमेतून खुरेश समाजाचे हाजी इब्राहिम साब, नायब सदर – फय्यूम कुरेशी साब व त्यांचे सर्व पदाधिकारी सहकारी मित्र व पदाधिकारी तसेच कुरेशी जमात चे नसिर खुरेशी साब , सैफन खुरेशी साब व त्यांचे सर्व सहकारी मित्र व पदाधिकारी तसेच कुंभार समाजाचे प्रतिष्ठित असे संजयजी बेलाळे आदींची यावेळी प्रमुख उपस्थित होती.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पुन्हा ट्रम्प

जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या महासत्ता अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे नेते डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा विराजमान होणार आहेत. मोठा गाजावाजा झालेल्या अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये विजयी होण्यासाठी गरजेचा असलेल्या २७० मतांचा आकडा डोनाल्ड ट्रम्प यांनी ओलांडला असल्याने आता ते दुसर्यांदा या महासत्तेच्या प्रमुख पदावर बसणार आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाकडून सत्ता खेचून आणताना डोनाल्ड ट्रम्प यांनी विद्यमान उपाध्यक्ष आणि अध्यक्षीय निवडणुकीतील डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांचा पराभव केला. भारतीय वंशाच्या असलेल्या कमला हॅरिस यांच्या पराभवामुळे अनेकांना दुःख झाले असले, तरी ट्रम्प यांच्या दुसर्या कारकिर्दीमध्ये भारतासाठी काही चांगले घडणार आहे, असे संकेतही मिळू शकतात. निवडणूक प्रचाराच्या कालावधीमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे माझे जवळचे मित्र आहेत आणि भारत हा आमचा सर्वात महत्त्वाचा भागीदार आहे असे अनेक वेळा सांगितले होते. अमेरिकेत असलेल्या ३० लाखांपेक्षा जास्त भारतीयांची मते मिळवण्यासाठी त्यांनी हे विधान केले, हेही तेवढेच खरे. गेल्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांना पराभव स्वीकारावा लागल्यानंतर त्यांनी ज्या प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त केली होती आणि अमेरिकेच्या लोकशाही इतिहासात पहिल्यांदाच ज्या प्रकारे हिंसक आंदोलन झाले होते हे पाहता खरे तर डोनाल्ड ट्रम्प यांची प्रतिमा बर्यापैकी मलीन झाली होती.

ट्रम्प सर्वात प्रथम जेव्हा अध्यक्ष झाले तेव्हासुद्धा त्यांची चार वर्षांची कारकीर्द अशीच वादग्रस्त होती. कोणत्याही निर्णयामध्ये त्यांनी गांभीर्य दाखवले असे दिसत नव्हते. जगातील सर्वात मोठ्या सत्तेचे प्रतिनिधित्व करतानाही अनेक वेळा डोनाल्ड ट्रम्प यांचा कॅज्युअल अप्रोच असायचा तरीही अमेरिकेतील जनतेने पुन्हा एकदा डेमोक्रॅटिक पक्षाला नाकारून रिपब्लिकन पक्षाला सत्ता दिली आहे. कारण गेल्या चार वर्षातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या सरकारनेसुद्धा काही वेगळे केले असे नाही. बायडेन यांच्यासारखे जास्त वयाचे अध्यक्ष अमेरिकेच्या जनतेला मानवले नाहीत. चार वर्षांच्या कालावधीत सरकारने काहीच वेगळे केले नाही. या निवडणुकीमध्ये ऐनवेळी बायडेन यांच्याऐवजी कमला हॅरिस यांना उमेदवारी देण्याची नामुष्कीसुद्धा या पक्षावर आली. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम होऊनच पुन्हा एकदा अमेरिकेतील जनतेने डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे सत्ता दिली आहे.

ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या चार वर्षांच्या कारकिर्दीमध्ये ज्या प्रकारे 'अमेरिका फर्स्ट' हे धोरण राबवले होते त्याच धोरणाच्या पुढच्या भागाला आता सुरुवात होणार आहे, हे उघड आहे. या निवडणुकीमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हा नवीन नारा दिला होता. साहजिकच इतर कोणत्याही देशांचा विचार न करता अमेरिकेचे हित समोर ठेवूनच निर्णय घेण्यावर नवे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचा भर असणार आहे, हे उघड आहे. अमेरिकेतील निर्वासितांचा प्रश्न असो किंवा नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत येणार्या इतर देशातील नागरिकांचा विषय असो याबाबत काही कठोर निर्णय येत्या काही कालावधीमध्ये घेतले जाण्याची शक्यता आहे. 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत स्पष्टपणे सर्वात प्रथम प्राधान्य हे अमेरिकेतील नागरिकांना, अमेरिकेतील उद्योगांना आणि अमेरिकेच्या हिताला दिले जाईल, असे सांगितले होते.

जगाच्या कानाकोपर्यातून नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत येणार्यांमुळे जर अमेरिकेतील नागरिकांना त्रास होत असेल तर याबाबतच्या धोरणाचा पुनर्विचार केला जाईल, असेही ट्रम्प यांनी अनेक वेळा सांगितले होते. साहजिकच परकीय नागरिकांनी अमेरिकेत नोकरीसाठी वास्तव्य करण्यासाठी जे नियम आहेत ते येत्या काही कालावधीमध्ये अधिक कठोर होण्याची शक्यता आहे. भारतातील अनेक युवक नोकरीच्या निमित्ताने किंवा इतर काही कारणाने अमेरिकेत सेटल झाले आहेत किंवा सेटल होण्याच्या प्रतिक्षेत आहेत त्या सर्वांना आता अमेरिकेच्या या नवीन धोरणाचा विचार करावा लागणार आहे. ट्रम्प यांनी अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचाराच्या कालावधीमध्ये अत्यंत स्पष्टपणे रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली होती. इस्रायल आणि हमास यांच्यातील संघर्षामध्ये सुद्धा इस्रायलच्या पाठीशी राहण्याची घोषणा केली होती. साहजिकच डोनाल्ड ट्रम्प यांचे परराष्ट्र धोरण कसे असेल त्याचे संकेतही तेव्हा त्यांनी दिले होते. ट्रम्प हे स्वतः मोठे उद्योगपती असल्याने कोणताही निर्णय कॉर्पोरेट पद्धतीने घेण्याची त्यांना सवय आहे. त्यामुळे अनेकदा कोणताही मागचा पुढचा विचार न करता एखादे विधान करणे किंवा एखादा निर्णय घेणे अशा अनेक गोष्टी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात घडल्या होत्या. गेल्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतरसुद्धा त्यांनी अशाच प्रकारच्या प्रतिक्रियांचे दर्शन घडवले होते. खरे तर सध्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेतील न्यायालयामध्ये अनेक खटले दाखल आहेत. पण आता पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या हातात सत्ता आल्यानंतर हे खटले विस्मृतीत जाणार आहेत हे उघड आहे. 'अमेरिका फर्स्ट' आणि 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणांना अमेरिकेतील जनतेने प्रतिसाद दिला हेच यावरून सिद्ध होते. अर्थात, अध्यक्षपदाची अधिकृत सूत्रे स्वीकारल्यानंतर अमेरिकेचे अधिकृत धोरण म्हणून डोनाल्ड ट्रम्प नक्की कोणते निर्णय घेतात हे पाहणेसुद्धा भारतासारख्या अनेक देशांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

# विद्यार्थी डॉ. बाबासाहेबांसारखा असावा

जगभरात अनेक महापुरुषांचे जन्म-मृत्यू दिवस विविध नावाने साजरे केले जातात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवन तथा व्यक्तिमत्वपैलूंच्या स्मृती प्रित्यर्थ विविध दिनोत्सव साजरे केले जातात. जसे त्यांची जयंती ज्ञानदीन, वकिली व्यवसाय सुरू केला तो दिवस, (लॉयर डे) वकील दिन, संविधान स्वीकृतीचा संविधान दिन. तसेच त्यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातार्‍याच्या प्रतापसिंग हायस्कूलमध्ये प्रथम प्रवेश घेतला तो दिवस सगळीकडे विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. जगामाजी या विविध दिवसांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे. कारण त्या दिवशी लोक त्या-त्या महापुरुषांना आठवण करून त्यांच्या ठायी नतमस्तक होतात. त्यांचा त्याग, कष्ट, समर्पणाप्रती कृतज्ञता व्यक्त करून प्रेरणा घेतात. काही लोक तर त्या दिवशी अंतर्मुख होऊन आपल्यातील गुण-दोषांची पडताळणी करून गुणांच्या भरभराटीस्तव आणि अवगुणांना निरस्तीकरणाच्या दिशेने संकल्पही करतात. महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करताना वरील बाबींची आवश्यकता तर आहेच. परंतु त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य कोणते? ते पूर्ण करण्याच्या दिशेने कूच करून त्यांना सहकार्य करणारांप्रति सहानुभूती, तर विरोधकांच्या पिलावळीपासून सावधानताही क्रमप्राप्त ठरते. त्याच दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थी दिवस हा अतिशय महत्त्वाचा ठरतो. कारण तो दिवस विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असतो. विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असल्यामुळे ते राष्ट्राचा आधारस्तंभ असतात. त्यांच्या भवितव्यावर समर्थ राष्ट्राचा डोलारा उभा राहणार असतो. म्हणून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे सर्वगुणसंपन्न असावे. त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती ओतप्रोत भरलेली असावी. दहा नैतिक मूल्यांसह चार महान मानवी मूल्यांनी त्यांचे व्यक्तिमत्व उभरलेले असावे. शेतीप्रधान देशामध्ये कष्टाला महत्त्व देणारे ते असावे. त्यासाठी श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता ही मूल्य त्यांच्या ठाई ठाई दिसावे. असे झाले नाही तर तरुणाई बेलगाम बेफाम होऊन राष्ट्र अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही. आणि अधोगतीला गेलेले राष्ट्र कुणाचे तरी गुलाम होऊन आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यास असमर्थ ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःला आजन्म विद्यार्थी समजत होते. एखाद्याने आयुष्यभर जरी विद्येची उपासना केली, तरी तो मनुष्य ज्ञानसागराच्या गुडघाभर पाण्यातच उतरू शकतो. एवढी ज्ञानाची अथांगता आहे. म्हणून प्रत्येक मनुष्य हा आजन्म विद्यार्थीच असला पाहिजे. विद्येची, ज्ञानाची उपासना करताना १२ डिसेंबर १९३८ ला मुंबई येथे अस्पृश्य विद्यार्थी संमेलनामध्ये विद्यार्थ्यांसमोर अतिशय वस्तुनिष्ठ आणि समाज प्रचलित उदाहरण देताना ते म्हणतात की, दारूचे व्यसन लागल्यानंतर जसं ते मरेपर्यंत सोडून जात नाही, तसं ज्ञानोपासणेच व्यसन जडलं पाहिजे. परगावातील एखाद्या प्रेयसीला भेटायला जाताना एखादा मनुष्य वेळा-काळाचे भान न ठेवता रस्त्यात येणाऱ्या संकटांना मात देतो. कोणतीही आडवाट त्याला थांबवू शकत नाही. जंगली श्वापदांची हिंस्र पशूंची त्याला भीती वाटत नाही, त्याप्रमाणे विद्येवर प्रेम केलं पाहिजे. जेणेकरून तीही तुमच्या प्रेमात पडेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात तीन महापुरुषांना गुरुस्थान देऊन तीन दैवतांची उपासना केली. ज्यामुळे त्यांना एका युरोपियन व्यक्तीने जगातील सहा विद्वानांमध्ये स्थान दिलं. त्यांचे तीन गुरु म्हणजे तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले. हे तीनही गुरु त्यांचे समकालीन नसून त्यांच्यासोबत त्यांचा जात, धर्म, पंथ असा कुठलाही तीळमात्र संबंध नव्हता. तरीही आयुष्यभर ते त्यांच्याच वाटेवरील वाटसरू म्हणून जगले. कारण त्यांच्यापैकी तथागत गौतम बुद्धाने मानवी मूल्यांची (समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता) प्रसव केली. तर त्या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी इतरांनी आपली हयात खर्ची घातली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तीन उपास्य दैवत म्हणजे विद्या, स्वाभिमान आणि शील. ज्यामुळे त्यांचा समाजात नैतिक धबधबा निर्माण झाला. विद्येच्या संदर्भात बोलताना ते म्हणतात की, मनुष्याला अन्नाप्रमाणे शिक्षणाची ही गरज असते. ज्ञानाशिवाय काहीही होऊ शकत नाही. परंतु आमच्यासाठी धर्माने ज्ञानाचे सर्व दरवाजे बंद केलेले होते. ड त्यांचे विद्येचे वेड हे भयंकर होते त्यांच्या वैयक्तिक ग्रंथसंभारामध्ये अनेक दुर्मिळ हस्तलिखिते व संदर्भग्रंथांसह २० हजार पुस्तकांचा संग्रह होता. त्यांचे दुसरे दैवत म्हणजे स्वाभिमान. आपल्या समाजात तो निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रथम प्राधान्य दिले. त्यांचे स्वतःचेही व्यक्तिमत्व स्वाभिमानाने ओत-प्रोत होते. त्यांच्या मते अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी विद्यार्थी हा स्वाभिमानी व स्वावलंबी असला पाहिजे. शेळी होऊन दीर्घायुषी होण्यापेक्षा वाघासारखे संघर्षरत अल्पायूषी होण्यास हरकत नाही. शिकलेला व्यक्ती जर स्वाभिमानी असेल तर तो स्वार्थापोटी कुठल्याही अमिषाला बळी न पडता आपल्या अंगीकृत कर्तव्यासाठी जागृत राहील. स्वावलंबी होण्यासाठी विद्यार्थ्यांने शिकून एखादी नोकरी मिळवणे हे वाईट नसलं, तरी त्यांच्यामध्ये काही दोष निर्माण होऊ नये. तो स्वार्थी बनू नये. आपणामध्ये जी लायकी निर्माण झाली, ती आपोआप झाली नसून त्यासाठी महापुरुषांनी खस्ता खाल्लेल्या आहेत. त्यामागे त्यांचा त्याग, कष्ट, समर्पण आहे. हे त्यांनी समजून घेतलं पाहिजे. त्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, शिकलेला व्यक्ती नोकरी मिळाल्यानंतर एवढा स्वार्थी बनतो, की समाजाकडे लक्ष द्यायला त्याला वेळच मिळत नाही. तो स्वार्थामध्ये एवढा गुरफटतो की स्वतःला शिक्षण प्रक्रियेमधून बाद करतो. त्याने तसं न करता क्षणाक्षणाला होणारे ज्ञान सतत वेचत राहिले पाहिजे. कोणी प्रवासात जरी असला तरी त्याच्याकडे चार दोन पुस्तके व वर्तमानपत्र असली पाहिजे. अन्यथा कष्टाने मिळवलेले ज्ञान विकसित झालेल्या सर्व कलाकुसर, कौशल्य लोप पावण्यास वेळ लागणार नाही. पाश्चात्य विचारवंत मॅझिनी म्हणतो की, लोकात पारतंत्र्य पसरले, मानसे शिकली तरी त्यांच्यात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणीव जास्त उत्पन्न होते. आपले कर्तव्य कोणते याची जाणीव होत नाही हा मोठा दोष. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तिसरे दैवत म्हणजे शील होय. शील म्हणजे सदाचरण. कोणाशीही दगाबाजी, फसवणूक, आत्मसिद्धीसाठी पाप न करणे. शीलाच्या संदर्भात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिमानाने सांगतात की, शील संवर्धन हा गुण माझ्यात मोठ्या प्रमाणात आहे. मी विलायतीला असताना दारू बीडीला हातही लावला नाही. मला कसलेही वेसन नाही. शील संवर्धना संदर्भात आणखी एका ठिकाणी ते म्हणतात की, मला माझे सर्व विरोधक घाबरतात. त्याचे कारण म्हणजे की मी खूप शिकलेला आहे, मी विद्वान आहे किंवा माझ्या मागे संपूर्ण अस्पृश्य समाज आहे असे नव्हे. तर मी शीलवान आहे. मी पराकोटीची गरिबी उपभोगली, तरी कोणासमोर हात पसरला नाही. मी कोणतेही पाप केल्याचे मला आठवत नाही.

आजन्म विद्यार्थी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समस्त बहुजन समाजातील (एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी) विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची, शिष्यवृत्तीची, नोकरीची आणि नोकरीनंतर बढतीची व्यवस्था निर्माण केली. सोबतच संविधानाच्या प्रकरण चार नीती निर्देशक तत्वाच्या अनुच्छेद ४६ नुसार दुर्बल वंचित घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करण्यासाठी राज्यांना जे काही करण्याची इच्छा असेल ते करण्यासाठी अधिकारीत केलेले आहे.

आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. संविधानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिलेले कवच निकामी करून त्यांना ज्ञान आणि धनापासून वंचित ठेवून मनुस्मृतीचे राज्य आणण्यासाठी टपलेली व्यवस्था वेळीच ठेचून काढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. त्यासाठी भारतीय संविधान प्रत्येकाने समजून घेऊन त्याचा सन्मान सुरक्षा व संवर्धन करणे अगत्याचे आहे. असे करणे म्हणजेच विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सच्चे अभिवादन करणे होय.

************

भिमराव परघरमोल
व्याख्याता तथा अभ्यासक
फुले शाहू आंबेडकरी विचारधारा
तेल्हारा जि. अकोला
मो.९६०४०५६१०४

# सोन्याचे वाढते साठे

गेल्या अडीच वर्षात भारतीय रिझर्व्ह बँकेने 'बँक ऑफ इंग्लंड'मध्ये ठेवलेले सुमारे १३० मेट्रिक टन इतके सोने पुन्हा भारतात आणले आहे. ब्रिटन व अन्य देशांतून परत आणलेल्या सोन्यामुळे रिझर्व्ह बँकेकडील सुवर्णसाठ्यात ६० टक्के वाढ झाली आहे. नेमके हे कशासाठी केले जाते आहे, हे समजून घेतले पाहिजे.

मार्च २०२२ मध्ये रिझर्व्ह बँकेकडील देशांतर्गत सोन्याचा साठा २९५ टन होता. सप्टेंबर २०२४ मध्ये तो ५१० टनांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. परंतु अद्यापही बँक ऑफ इंग्लंडमध्ये आपले ३२४ टन सोने पडूनच आहे. दोन वर्षांपूर्वी तेथील भारताचा साठा ४५३ टन इतका होता. देशांतर्गत सुवर्णसाठ्यात रिझर्व्ह बँकेने ८५ टनांची




भर घातली आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत आपल्या एकूण साठ्यात २१४ टनांची भर पडली आहे. दोन वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेकडे एकूण ७६० टन सुवर्णसाठा होता, तो आता ८५४ टनांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. सोन्याचा साठा सुरक्षितपणे ठेवावा लागतो आणि आपली अशा प्रकारे साठवणूक करण्याची क्षमता वाढलेली आहे.

भारत हा एक सार्वभौम देश आहे आणि त्यामुळे आपले सोने दुसर्या देशात कशासाठी ठेवायचे, हा प्रश्न आहेच! रिझर्व्ह बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडून सोने खरेदी करते. बर्याच वर्षांपासून आपण देशाबाहेर ठेवलेल्या सोन्याच्या साठ्याची परिस्थिती 'जैसे थे' होती. मात्र गेल्या काही वर्षांत निधी व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँक सोन्याची सातत्याने खरेदी तर करत होतीच, परंतु त्याचवेळी बाहेरील देशांत ठेवण्यात आलेल्या आपल्या सोन्याच्या साठ्यातही वाढ होत होती. आता अधिकाधिक प्रमाणात सोने साठवण्याची रिझर्व्ह बँकेची क्षमता वाढलेली आहे आणि म्हणून त्याचे साठे वाढविण्यात येत आहेत.

भारताची आर्थिक परिस्थिती पूर्वी अत्यंत बिकट होती. १९८९ मध्ये देशातील राजकीय अस्थिरता वाढली. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये तत्कालीन राजीव गांधींचा पराभव झाला. त्यानंतर व्ही. पी. सिंग यांचे राष्ट्रीय आघाडीचे सरकार आले. परंतु ते स्थिर नव्हते. ते अल्पकाळ टिकले. देशात राम मंदिरासाठी आंदोलन तीव्र झाले आणि त्याचवेळी मंडल प्रश्नावरूनदेखील रणकंदन माजले. व्ही. पी. सिंग सरकार कोसळले आणि त्यानंतर चंद्रशेखर यांचे सरकार आले. तेसुद्धा अल्पायुषी ठरले.

राजकीय अस्थिरतेमुळे आणि सवंग आर्थिक धोरणांमुळे देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला होता. त्यामुळे १९९१च्या सुरुवातीलाच चलनसाठ्याची परिस्थिती खालावून परकीय कर्जाची परतफेड करणे व त्यावर व्याज देणेही कठीण झाले होते. १९८०-८१ मध्ये भारताच्या डोक्यावरील परकीय कर्ज २,३५० कोटी डॉलर्स होते. ते १९९०-९१ मध्ये ८,३८० कोटी डॉलर्सपर्यंत वाढले. केंद्र व राज्य सरकारचे एकत्रित अंतर्गत कर्जाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण ५५ टक्के एवढे झाले. भारताचा परकीय चलनसाठा १०० कोटी डॉलर्स, म्हणजे केवळ दोन आठवड्यांची आयातीची गरज भागवण्यास पुरेल एवढाच होता. त्याचवेळी इराकने कुवेतवर आक्रमण केल्यामुळे कच्च्या तेलाचे भाव भडकले होते. आखाती देशांतील भारताच्या निर्यातीवरही परिणाम झाल्याने चलनसाठ्यात अपेक्षित भर पडू शकली नाही.

भारताचा आंतरराष्ट्रीय पतदर्जा कमी करण्यात आल्याने विदेशी कर्ज उभारण्यातही अडचण निर्माण झाली. भरीस भर म्हणून की काय, अनिवासी भारतीयांनी देखील आपल्या परकीय चलनातील ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे चंद्रशेखर पंतप्रधानपदी असताना तातडीचा उपाय म्हणून मे १९९१ मध्ये भारतीय गंगाजळीतील २० टन सोने स्विस एअरवेजच्या विमानातून आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीसाठी पाठवावे लागले. त्या पाठोपाठ 'बॅलन्स ऑफ पेमेंट' सांभाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेला राखीव सोने बँक ऑफ इंग्लंड व बँक ऑफ जपान यांच्याकडे गहाण ठेवून, इतर कर्जफेडीसाठी कर्ज घ्यावे लागले. त्यानंतर नाणेनिधीने भारताला ५ हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध केले. एवढे करूनही पुरेसे झाले नाही. त्यामुळे त्यानंतर नरसिंह राव सरकारने २१ जुलै १९९१ रोजी रुपयाचे ३० टक्के अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. मग आर्थिक उदारीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

आज भारताकडे ६८५ अब्ज डॉलर्स इतकी विदेशी गंगाजळी उपलब्ध आहे. त्यामधून वर्षभराची आयात करता येऊ शकते. त्यामुळे सोने गहाण ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आज परदेशांमध्ये आपण सोने ठेवले आहे, ते तेथे सुरक्षितपणे साठे ठेवता येतात म्हणून. परंतु गेल्या ३० वर्षांत सोने सुरक्षितपणे साठवून ठेवण्याची आपली क्षमताही विकसित झाली आहे. जगात सोन्याचा सर्वाधिक साठा अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडे आहे.

दुसर्या क्रमांकावर बँक ऑफ इंग्लंड आहे. जगातील बहुतेक सर्व मध्यवर्ती बँकांनी आपल्याकडील सोने बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवले आहे. बँक ऑफ इंग्लंडकडे चार लाख सोन्याच्या बार्सचा साठा आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर, २०२२ मध्ये अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लादले. तेव्हापासून जगातील मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करू लागल्या आहेत. अमेरिकी डॉलरवर असलेले अवलंबित्व कमी करणे आणि विदेशी चलनसाठ्यातील सोन्याच्या साठ्याची टक्केवारी वाढवणे, हे सगळ्यांचे धोरण आहे. चलनवाढीच्या परिस्थितीस तोंड देण्यासाठी सोने 'हेज' म्हणून किंवा तारण म्हणून चांगले समजले जाते.

मध्यंतरी जगात सर्वत्र सोन्याचे भाव वाढत होते. डॉलरला पर्याय म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. त्यामुळेच केवळ मध्यवर्ती बँकाच नव्हे, तर सर्वसामान्य माणूसही सोने घेत असतो. अनिश्चित भविष्यकाळास तोंड देण्यासाठी सोने हे उत्तम माध्यम आहे, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. त्यामुळे सोन्याचे मोल हे कधीच कमी होणार नाही!

# एससी, एसटी, ओबीसी, एनटी आरक्षणासाठी वंचितचा शिलेदार सुनील जाधव मैदानात

गुहागर :– सध्या निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने तथाकथित कंबर कसलेले, तेल लावलेले, आश्वासन देऊन विसरणारे, गरजेपुरती कोणालाही लाडके म्हणणारे उमेदवार व त्यांचे पक्ष निवडणुकीच्या रणधुमाळीत मैदानात सर्वशक्तीनिशी उतरले आहेत, कारण काहीही करून निवडणूक जिंकणे हेच त्यांचे लक्ष्य आहे, महाराष्ट्रात आज अनेक उपेक्षित, दुर्लक्षित, प्रलंबित प्रश्नांचा वनवा पेटलेला असताना सर्वच राजकीय पक्ष त्या आगीत आपली पोळी भाजू बघत आहेत, एका बाजूला जनतेला खोटी प्रलोभने दाखवून जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढवल्या जात आहेत, सरकारी शिक्षण व तरुणांना सरकारी नोकऱ्या संपुष्टात येत आहेत, एससी, एसटी, ओबीसी आरक्षणवर हल्ला होत आहे, अनेक कारखाने, उद्योगधंदे हे परराज्यात स्थलांतरित होत आहेत, खेडेगावात पिण्याचे पाणी ही उपलब्ध होत नाही अश्या अनेक समस्या असतानाही त्यांना पद्धतशीर कानाडोळा करीत राजकीय पुढारी खुर्चीकरता भांडण्यात, पक्ष फोडण्यात एकमेकांचे आमदार–खासदार पळवण्यात मग्न झालेले आहेत म्हणून गुहागर तालुक्यातील जानवळे गावातील सुपुत्र, गरीब कुटुंबात जन्माला आलेले, देशासाठी सीमेवर उभं राहून शत्रूला झुंज देणारे, कार्यतत्पर, कोणाच्या हाकेला धावून जाणरे, सुशिक्षित, समाजसेवेचे भान असलेले माजी सैनिक सुनील सखाराम जाधव हे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, फुले–शाहू–आंबडेकरी विचारधारा टिकवण्यासाठी, एससी, एससी, ओबीसी आरक्षण अबाधित राखण्यासाठी निवडणूकीच्या रणधुमाळीत उतरले आहेत. गरीब घरात जन्माला आलेले सुनील सखाराम जाधव यांनी खडतर परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण करून भारतीय सैन्य दलात ते सामील झाले, एकनिष्ठपणे देशाची सेवा करून सन्मानाने सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या गावच्या मातीत ते परतले त्यानंतर सामाजिक बांधिलकी जोपासत बौद्धजन सहकारी संघ या सामाजिक संस्थेची धुरा त्यांनी सांभाळली व गाव–मुंबई या शाखांमध्ये असलेला दुरावा दूर करून त्यांना एकसंघ करण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले, गाव–मुंबई शाखांच्या अधिपत्याखाली तालुक्यात अनेक स्तुत्य उपक्रम राबवून ते यशस्वीपणे पार पाडले, कोरोना काळात स्वतः च्या जीवाची पर्वा न करता गाव व मुंबईच्या सहकार्याने घेऊन तालुका आणि तालुक्याच्या बाहेरील सर्व जाती–धर्म–पंथाच्या देशबांधवांसाठी गावागावात, घराघरात पोहोचून त्यांना आर्थिक आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याचे काम त्यांनी केले तसेच चक्रीवादळ व महापूर या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक घरांची पडझड झाली, भातशेती वाहून गेल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं, कुटुंब रस्त्यावर आली अश्या वेळीही आपातग्रस्तांना मदत करण्यासाठी जीवाची बाजी करून त्यांनी पुढाकार घेत एक हात मदतीचा देत सर्वांना मदत करण्याचे महत्कार्य केले, कोणताही जात–धर्म–पंथ असा भेदाभेद न करता तो केवळ भारतीय नागरिक आहे या शुद्ध भावनेने त्यांनी सर्वांना मदत केली. अश्याप्रकारे दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून राबणारा, साधा–सरळ व नेकदिलाचा, सर्वांच्या सुख–दुःखात धावत जाणारा, स्वतःची पर्वा न करता वेळप्रसंगी सर्वांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सर्वांच्या सुख–दुःखात हजर राहणारा, सर्वांचा हक्काचा माणूस म्हणून सुनील सखाराम जाधव हे नेहमी आघाडीवर असतात. सुनील सखाराम जाधव हे सरळमार्गी, नेकदिल, प्रेमळ, मनमिळाऊ स्वभावाचे, माणस जोडत माणुसकी जोपासणारे, निस्वार्थी व्यक्तिमत्त्व असलेले व एससी, एसटी, ओबीसी, हिंदू–मुस्लिम, बौद्ध, इसाई अश्या सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणारे असे व्यक्तिमत्त्व असून सामाजिक भान लक्षात घेऊन राजकारणाबच्या माध्यमातून समाजकारण करीत जनतेची सेवा करण्याचा व एससी, एसटी, ओबीसी, एनटी, मुस्लिम अल्पसंख्याकांचे आरक्षण वाचवण्याचा व संविधान विरोधी प्रवृत्तींना विरोध करण्याचा संकल्प करून हा तरुण निवडणुकीच्या मैदानात उतरला आहे. बालपणापासूनच आंबेडकरी विचारधारेचे बाळकडू पिलेले सुनील सखाराम जाधव आंबेडकरी घराण्याशी एकनिष्ठ असून आंबेडकरी कुटुंबावर अमाप प्रेम करतात, श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन हा तरुण दिवसरात्र झटत आहे, आज एससी, एसटी, ओबीसी, एनटी, मुस्लिम यांचे कित्येक प्रश्न विधानसभेत ताटकळत असून त्यांना हक्काच्या माणसाचा आवाज हवा आहे, सुनील सखाराम जाधव जर का आज विधानसभेत गेले तर त्या ताटकळत असलेल्या असंख्य प्रश्नांना वाचा फोडून आंबेडकरी विचारांची ही तोफ विधानसभेत कडकडल्याशिवाय राहणार नाही, एससी, एसटी, एनटी, ओबीसी यांचे धोक्यात असलेले आरक्षण वाचवण्यासाठी धडाडीने पुढे सरसावत हा भीमरावांचा छावा आरक्षणविरोधकांना पाणी पाजल्याखेरीज माघार घेणार नाही, गुहागर तालुक्याच्या विकासासाठी, रस्ते, पाणीप्रश्न यांच्या नियोजनासाठी दिवसरात्र



मेहनत करून त्याची पूर्तता करून देईल, विद्यार्थी, तरुण, स्त्रिया यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहील, बंद असलेल्या सरकारी सुविधा, योजना पुन्हा सुरू करून त्या राबविण्याचा प्रयत्न करेल, वाढती महागाई रोखण्यासाठी, बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रयत्न करेल म्हणून सुनील सखाराम जाधव यांच्यासारखा तरुण, तडफदार कार्यकर्ता विधानसभेत गेला पाहिजे, वंचित बहूजन आघाडीचा ए.बी. फॉर्म येण्यास उशीर झाल्यामुळे सुनील सखाराम जाधव हे अंगठी ही निशाणी घेऊन अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिले आहेत त्यामुळे बलाढ्य प्रतिस्पर्धकांचे धाबे दणाणले असून त्यांना ही घाम फुटला आहे असे वातावरण सध्या गुहागर तालुक्यात दिसून येत आहे, तरुणांची मोठी फळी त्यांच्यामागे उभी असून सर्वच जाती धर्मातील लोक त्यांना पाठींबा देण्यास सरसावले आहेत. अपक्ष म्हणून उभे राहिले असले तरी ते शेवटी वंचित बहुजन आघाडीचेच उमेदवार आहेत. आज निवडणूका जवळ आल्यामुळे अनेक नवनवीन प्रलोभने असणाऱ्या योजनाचे पेव फुटले आहे कागदोपत्री व जाहिरातीत असणाऱ्या या योजना प्रत्यक्षात मात्र तितक्या प्रभावी नसून त्यांचा म्हणावा असा कोणताही फायदा होत नसून केवळ मतदारांची दिशाभूल करण्याचे काम विद्यमान सरकार करीत आहे तसेच एससी, एसटी, एनटी, ओबीसी, मुस्लिम अल्पसंख्याक यांच्या आरक्षणाच्या व सविधानाच्या विरोधात असलेल्या सरकारचा विरोध करीत घटनाविरोधी व आरक्षणविरोधी सरकारला मतदान न करता, आरक्षण व संविधान पुरस्कर्ते, एससी, एसटी, एनटी, ओबीसी, मुस्लिम अल्पसंख्याक यांच्यावरील क्रिमिलेयर व वर्गीकरण हटवण्यासाठी झटणाऱ्या श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या हाताला बळकटी देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली व विचारधारेखाली चालणाऱ्या सुनील सखाराम जाधव व तमाम वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना विजयी करून विधानसभेत पाठवणे गरजेचे आहे म्हणून मतदार राजाने आपली सद्विवेकबुद्धि वापरून योग्यच उमेदवाराला मत द्यावे.

## शिवसेना उपतालुकाप्रमुख पदी तानाजी धस यांची निवड..!




केज/प्रतिनिधी शिवसेना–उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवजी बाळासाहेब ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या आदेशावरून, मराठवाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमाताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे,शिवसेना सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे व तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या उपस्थितीत तानाजी धस यांची शिवसेना उपतालुकाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. यानिवडीने येणाऱ्या काळात केज तालुक्यात शिवसेना वाढीसाठी प्रयत्न करणार असे तानाजी धस यांनी सांगितले.

## येडेश्वरी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा संपन्न!

कारखान्याच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते शेतकरी आणि कामगार यांचे हित कारखाना होणार असून शेतकऱ्यांच्या ऊसाला एफआरपी पेक्षा जास्त भाव देणार आहे. तसेच कामगार वर्गांना समाधान कारक पगार दिला जाणार आहे. --- खा. बजरंग सोनवणे
चेअरमन येडेश्र्वरी साखर कारखाना

कारखान्याच्या माध्यमातून खा. बजरंग सोनवणे यांनी शेतकरी आणि कामगार वर्गासह तरुणांच्या हाताला काम देवून त्यांचे कल्याण केले आहे.
---- भाई मोहन गुंड,
शेकाप नेते

केज/प्रतिनिधी येडेश्वरी साखर कारखान्याच्या सन २०२४–२५ या वर्षाच्या अकराव्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ बीड जिल्ह्याचे खासदार तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभहस्ते आणि शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सारिका सोनवणे व सोनवणे परिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. रामेश्वर उबाळे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमा रामेश्वर उबाळे यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे संचालक प्रा. बाळकृष्ण (बापु) भवर यांनी केले तर बाळासाहेब गलांडे, नारायण आबा शिंदे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



या प्रसंगी ज्येष्ठ नेते नवाब मामु, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब दादा बोराडे, व्हॉईस चेअरमन पिंटू ठोंबरे, दिलिप आबा गुलभिले, रमेश आबा शिंदे, न. प. केजचे गटनेते भाऊसाहेब गुंड, माजी सभापती अशोक तारळकर, नारायण शिंदे, विलास जोगदंड, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा सौ. संजीवनीताई देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, बंडू चौधरी, लाला वायबसे, शितल लांडगे, नर्गिस बागवान, बाळासाहेब गलांडे शरिफभाई सय्यद, राहुल खोडसे तसेच सभासद, शेतकरी, ठेकेदार, कामगार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी राजे यांचा आशीर्वाद घेऊन शहर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवतोय-स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे

लातूर :– सध्या निवडणुकीची रणधुमाळी लातूर जिल्ह्यात सुरू असून लातूर शहरातील सामाजिक कार्यकर्ते सतीश राजेंद्र करंडे हे परिवर्तन महाशक्ती महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने लातूर शहर विधानसभा मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून त्यांनी छत्रपती संभाजी राजे यांचा आशीर्वाद घेऊन निवडणुक लढवत असून छत्रपती संभाजी राजे यांचा हात माझ्या पाठीवर असल्याने माझा विजय निश्चित असल्याचे सतीश करंडे यांनी गुरुवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजता लातूर येथील हॉटेल रसिका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. याच पत्रकार परिषदेत जाहीरनामा स्वराज्याचा निर्धार परिवर्तनाचा हा निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने सतीश करंडे लातूर शहर मतदारसंघातून निवडणूक लढवत असून त्यांनी आज पत्रकार परिषदेत जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे यामध्ये इंदोर शहराच्या धर्तीवर घनकचरा व्यवस्थापन करून लातूरचे स्वच्छ सुंदर



बनवण्यात येईल,जिल्हा रुग्णालयाचा प्रलंबित असलेला प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यात येईल, मांजरा धरणातून इतरत्र वाहून जाणारे पाणी लातूर शहराला उपयुक्त व उपलब्ध करण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजना लातूरसाठी आरक्षित असणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या आरक्षण वाढवण्यात येईल यासह अनेक मुद्दे जाहीरनाम्यामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र परिवर्तन महाशक्ती स्वराज्य पक्षाचे मराठवाडा प्रमुख किशोर दाताळ जिल्हा उपाध्यक्ष शुभम थेटे युवा शहर अध्यक्ष कुणाल बिराजदार कामगार प्रमुख सुदर्शन गाडगे यांची उपस्थिती होती.

## नामनिर्देनपत्र दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर ‘ती’ मंडळी निवडणुक अधिकाऱ्याच्या दालनात काय करीत होती–

लातूर /प्रतिनीधी : – लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्देनपत्र दाखल करण्याची अंतीम मुदत दि.२९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत होती. या अंतीम मुदतीनंतर दि. २९ ऑक्टोबरच्या मध्यरात्री आणि दि. ३० ऑक्टोबरच्या पहाटे काही राजकीय पार्श्वभुमी असलेली मंडळी निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या दालनात व तहसील कार्यालयाच्या मुख्य इमारतीत कागदपत्रांसह काय करीत होती. याचे पारदर्शक स्पष्टीकरण निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी द्यावे, अशी तक्रार लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्याची माहिती लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे पक्ष निरीक्षक रामहरी रुपनवर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे व शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड़ किरण जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दि.७ नोव्हेंबर रोजी येथील काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत पक्ष पदाधिकाऱ्यांनी उपरोक्त माहिती दिली. यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी महापौर अ‍ॅड़ दीपक सुळ, माजी उपमहापौर कैलास कांबळे, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती अशोक गोविंदपूरकर, व्यंकटेश पुरी, प्रविण सूर्यवंशी, राम गोरड आदी उपस्थित होते. निवडणुक आयोगाने दिलेल्या निवडणुक कार्यक्रमानूसार दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत होती. या मुदतीनंतर दि. २९ ऑक्टोबरच्या मध्यरात्री २ वाजता ते दि. ३० ऑक्टोबरच्या पहाटे ४ वाजेपर्यंत काही राजकीय पार्श्वभूमी असलेली मंडळी निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या दालनात तसेच तहसील कार्यालयाच्या मुख्य इमारतीच्या परिसरात कागदत्रांसह दिसून आले आहेत. शासकीय कार्यालय बंद झाल्यानंतर रात्री, अपरात्री कर्तव्यावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्या व्यतिरिक्त इतर नागरिकांना निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश कसा मिळू शकतो. याचाच अर्थ असा आहे की, जे लोक अशा अवेळी कार्यालयात दाखल झाले आहेत ते नामनिर्देशन पत्रातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठीच आले होते. आपल्या सहायक कर्मचाजयांच्या मदतीने त्यांनी ते ज्या पक्षाची संबंधीत आहेत त्या पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रातील त्रुटी दुरुस्त केल्या आहेत, अशी आमची खात्री आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे या प्रकाराची सखोल चौकशी झाली पाहिजे. निवडणुक निर्णय अधिकाजयांनी कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी. जे जे लोक उपस्थित होते त्यांची चौकशी करावी. अशा व्यक्तींना कार्यालयात प्रवेश कोणत्या आधारे दिला, याबाबत निष्पक्षपणे चौकशी होणे गरजेचे आहे, अन्यथा निवडणुक प्रक्रियेवर असलेला सर्वसामान्य मतदारांचा विश्वास राहणार नाही. तसेच उपरोक्त कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज आम्हाला उपलब्ध करुन द्यावे, असे लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे नोंदविलेल्या तक्रारीत नमुद केल्याचे अ‍ॅड़ किरण जाधव म्हणाले.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची ८ नोव्हेंबर रोजी लातूर, रेणापूर व निलंगा येथे सभा

लातूर /प्रतिनीधी :– महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या सभा आज दि.८ नोव्हेंबर रोजी लातूर शहर, रेणापूर व निलंगा येथे आयोजित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे पक्ष निरीक्षक रामहरी रुपनवर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे व शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड़ किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. काँग्रेस भवनमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेस माजी महापौर अ‍ॅड़ दीपक सुळ, माजी उपमहापौर कैलास कांबळे, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती अशोक गोविंदपूरकर, व्यंकटेश पुरी, प्रविण सूर्यवंशी, राम गोरड आदी उपस्थित होते. निलंगा विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार अभय साळुंके यांच्या प्रचारार्थ आज दुपारी २ वाजता निलंगा, लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचारार्थ लातूर शहरातील गंजगोलाई परिसरातील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारकाच्या परिसरात दुपारी ४ वाजता तर काँग्रेस महाविकास आघाडीचे लातूर ग्रामीणचे उमेदवार आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ रेणापूर येथे सायंकाळी ७ वाजता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची सभा होणार आहे. या सभांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, अल्पसंख्यांक काँग्रेसचे सेलचे प्रदेशाध्यक्ष वजाहत मिर्झा, माजी खासदार सुधाकर शृंगारे, आमदार धिरज विलासराव देशमुख उपसिथत राहणार आहेत. निलंगा, लातूर व रेणापूर येथे होणाजया या सभांना मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर जिल्हा काँग्रेस व लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने करण्यात आले.

# संधीचे सोने करा आणि आणि आपली लाडकी बहीण डॉ. अर्चनाताई पाटील यांना निवडून द्या - कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचे आवाहन

## जनतेचा हरवलेला सन्मान परत मिळवून देण्यासाठी माझी उमेदवारी – डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

गंगापूरकरांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवणार मतदार हा राजा आहे, लोकशाहीमध्ये मतदार हा कायमस्वरूपी राजाच असावा असे अपेक्षित असताना, लातूर शहर मतदार संघात मतदार याचिकाच्या भूमिकेत दिसतो हे चित्र बदलण्यासाठी आपल्या सगळ्यांना मिळून प्रयत्न करायचे आहेत. गंगापूर गावात काढण्यात आलेल्या पद यात्रेमध्ये गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गंगापूरकरांनी दाखवलेल्या प्रेमाची उतराई होणे अशक्य आहे. आपल्या ऋणात राहूनच समाजातील प्रत्येक स्तरातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी मी कार्य करणार आहे असा शब्द डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी यावेळी दिला. विरोधकांच्या कोणत्याही भूलथापांना बळी न पडता डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी यावेळी केले. प्रारंभी गंगापूर येथील श्री हनुमान मंदिरात महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी श्री हनुमानाचीं मनोभावे पुजा व आरती करून आशीर्वाद घेतले. गंगापूरकरांच्या प्रचंड उत्साहात पदयात्रा काढून प्रत्येक गावकऱ्यांना घरोघरी जाऊन त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधून महायुती सरकारच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून कमळाच्या चिन्हावर मतदान करून विजयावर शिक्कामोर्तब करण्याचे आव्हान केले. पदयात्री दरम्यान गावातील महिलांनी ठीक ठिकाणी डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचे औक्षण केले. पदयात्रेत फटाक्यांचे आतिषबाजी आणि अर्चनाताई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, एकच चर्चा, पाटील अर्चना. भाजपा माहितीचा विजय असो घोषणांनी गंगापूर गाव दणाणून सोडले. गावकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत माहितीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजय त्यांचाच असल्याचे दाखवून दिले. पदयात्रेनंतर झालेल्या जाहीर सभेस माहितीच्या घटक पक्षातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि गंगापूर व परिसरातील नागरिक संख्येने उपस्थित होते.



लातूर /प्रतिनिधी : भाजपा महायुतीच्या सरकारने समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विविध योजना राबवले आहेत. या योजनेची अंमलबजावणी करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आर्थिक सक्षम करण्याचे काम करण्यात आले. आता सर्व मतदारांनी माहितीच्या अधिकृत उमेदवार आपल्या सर्वांची लाडकी बहीण डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना खंबीर साथ देऊन निवडून आणावे असे आव्हान कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केले. लातूर शहर मतदार संघातून भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई महायुतीच्या अधिकृत उमेदवार अर्चनाताई पाटील चाकुरकर यांच्या प्रचारा निमित्त गंगापूर येथे बुधवार (दि. ७) रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माहितीच्या अधिकृत उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शिवसेनेचे संपर्कप्रमुख ॲड. बळवंत जाधव, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष सचिन दाणे, गंगापूरचे माजी सरपंच बाबू खंदाडे, महिला मोर्चाचे अध्यक्ष रागिणीताई यादव, भाजपा जिल्हा सरचिटणीस दिग्विजय काथवटे, शिरीष कुलकर्णी, प्रवीण सावंत, ॲड. गणेश गोमसाळे, लालासाहेब देशमुख, माणिकराव आलुरे, पृथ्वीसिंग बायस, भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल पतंगे, संघाचे चेअरमन शिवसिंह सिसोदिया मीनाताई गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्षपाशा पटेल म्हणाले की, महायुतीचे सरकार महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर घेऊन जात आहे, विकासाचा हा परत राज्यात माहिती सरकार येणे आवश्यक आहे असे सांगून, त्यासाठी अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना मतदानाचे भरभरून दान लाडक्या बहिणींनी द्यावे असे आवाहन केले. भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी आमदारांच्या नाकर्तेपणावर जाहीर टीका करून लातूरला प्रगतीपथावर घेऊन जायचे असेल तर भाजपा, महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी करण्याचे आवाहन केले. शिवसेना जिल्हाध्यक्ष सचिन दाने यांनी बोलताना सांगितले की, विरोधी पक्षाच्या कोणत्याही भूलथापांना बळी न पडता माहितीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनाहाताने विजयी करावे.

ॲड. बळवंत जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की तुमच्या संपर्कात जो उमेदवार राहणार आहे त्याच उमेदवाराला मतदारांनीआपल्या मताचे बहुमूल्य दान द्यावे. रागिणी ताई यादव यांनीबोलताना सांगितले की, आपली लाडकी बहीण अर्चनाताईया उच्चशिक्षित, सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या आहेत. महिलांना सर्व दृष्टीने सक्षम करणे हेच त्यांचे प्रमुख लक्ष आहे. त्यांचे हात मजबूत करून माहिती सरकारला परत राज्यात निवडून देण्याचे आवाहन रागिनीताई यादव यांनी केले.

प्रचाराच्या जाहीर प्रचार सभेचे प्रस्ताविक करताना माजी सरपंच बाबू खंदारे यांनी सांगितले की, मी सरपंच असताना गंगापूर मध्ये विकास निधी खेचून आणला तेवढा निधीही लातूरच्या आमदाराला पंधरा वर्षाच्या कार्यकाळात लातूरला विकास निधी आणता आला नाही. आम्ही आलेल्या नदीचे बॅनर लावून जनतेची दिशाभूल करण्याचे काम हे करत आहेत. यामुळे नागरिकांनी आता महायुतीच्या उमेदवार डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनाच बहुमताने निवडून देऊन शाश्वत विकासाला आपला पाठिंबा द्यावा असे आव्हान त्यांनी यावेळी केले.

## महायुतीच्या सौ. संजीवनीताई कराड यांना लातूर तालुक्यात महिलांचा मोठा प्रतिसाद

लातूर :– लातूर ग्रामीणचे लोकप्रिय भाजपा महायुतीचे उमेदवार, विकासपुरुष लोकनेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारार्थ त्यांच्या अर्धांगिनी सौ. संजीवनीताई कराड यांना लातूर तालुक्यातील गावागावात प्रचार दौऱ्याला महिला मतदारांचा प्रत्येक ठिकाणी वाढता पाठिंबा मिळत आहे. संजीवनीताई यांच्या भावनीक मनोगतास मोठा प्रतिसाद मिळत असून यावेळी आम्ही लाडक्या भावालाच मत देणार असे उपस्थित महिलांकडून बोलून दाखवले जात आहे.

गेल्या २० वर्षांपासून संघर्षातून आज मा. रमेशआप्पा कराड साहेबांनी सर्वसामान्य जनतेसोबतची घट्ट नाळ बांधली म्हणूनच मतदार संघातील सर्वसामान्य नागरिक आवर्जून रमेशआप्पा कराड साहेबांना आपला पाठिंबा भक्कमपणे देत आहेत...! भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई कराड यांनी लातूर तालुक्यातील ममदापूरपाटी, भातखेडा, भडी, धनेगाव, मुशिराबाद, सलगरा (खु), बोरी, सलगरा (बु), बोकनगाव यासह अनेक गावचा दौरा करून महिला मतदारांशी संवाद साधला यावेळी त्यांच्या समावेत महिला आघाडीच्या आयोध्या आंबेकर, सुरेखाताई पुरी, पार्वती सोमवंशी, पूनम आयवते, छाया मुळे, कस्तुरबा बोडके यांच्यासह विजयकुमार मलवाडे, गोविंद नरहरे, मारुती शिंदे, हनुमंत गव्हाणे, बापूराव चांमले, रुपेश थोरमोठे, चंद्रकांत पासमे सतीश बिराजदार, विजय मलवाडे, अशोक बिराजदार, वाजिद पटेल, आदिनाथ मुळे, रुपेश काळे, लक्ष्मण मुळे, सुरेश पाटील, अशोक बिराजदार,





गणेश माकने, एकनाथ काळे, गंगाधर जाधव, रामचंद्र धनवे अंकुश बेंबडे मनोज पाचवे माणिक कांबळे यांच्यासह अनेक जण होते.

ग्रामीण भागातील गावागावात सौ. संजीवनीताई कराड जिथे जिथे जातात तिथे तिथे महिलांची उत्स्फूर्तपणे मोठी उपस्थिती दिसून येत आहे. गावच्या विकासासाठी कुटुंबाच्या कल्याणासाठी आणि भावी पिढीच्या हितासाठी विकसनशील नेतृत्व महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनाच आपले मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन करीत आहेत.

महायुती शासनाने महिलांसह सर्वांसाठी सुरू केलेल्या विविध योजना या पुढील काळातही कायम ठेवण्यासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणे गरजेचे असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. रमेशआप्पा कराड यांनाच आपले आशीर्वाद द्यावेत असे आव्हान संजीवनीताई यांच्याकडून केले जात आहे त्यांच्या या आव्हानाला महिला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे...!

## आनंद गायकवाड यांचे निधन



केज/प्रतिनिधी तालुक्यातील मांगवडगाव येथील तरुण आनंद बापूराव गायकवाड वय २५ वर्ष यांचे बुधवार रोजी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते अल्प आजाराने त्रस्त होते. उपचारासाठी त्यांना संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या निधनाने परिसरावर शोककळा पसरली. त्यांच्या पक्षात आई–वडील, भाऊ असा परिवार आहे. मांगवडगाव येथील स्मशानभूमीत सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या विजयासाठी शिवसैनिकांनी जिद्दीने जमाने कामाला लागावे शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख ॲड बळवंत जाधव यांचे आवाहन

लातूर :– राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या हिताचे अनेक निर्णय घेतले असून त्यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री करण्यासाठी लातूर ग्रामीण मतदार संघातून महायुतीचे उमेदवार आ= रमेशआप्पा कराड विजय होणे गरजेचे असून रमेशआप्पांच्या विजयासाठी शिवसैनिकांनी जिद्दीने जोमाने कामाला लागावे असे आव्हान जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या समन्वयासाठी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यात शिवसेना पदाधिकारी आणि प्रमुख शिवसैनिकांची बैठक झाली या बैठकीस महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, जिल्हा प्रमुख सचिन दाने, भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, शिवसेना जिल्हा युवा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, शिवसेना महिला आघाडीच्या सौ. बावगेताई, राधिका पाटील, वळसे महाराज यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.






गेल्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी लातूर मतदार संघाचा सौदा करून शिवसैनिकाचा गळा कापला असल्याचे सांगून अँड बळवंत जाधव म्हणाले की, या मतदारसंघात स्वाभिमानाची लढाई आहे. आपल्याच घरात सत्ता ठेवण्याचे षडयंत्र सातत्याने यशस्वी करणाऱ्या देशमुखांनी सत्तेचा गैरवापर करून कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा सातत्याने छळ केला. कोणत्याही परिस्थितीत लातूर ग्रामीण मतदार संघातून रमेशआप्पा कराड यांचा विजय होणे काळाची गरज आहे आप्पांना मत म्हणजे एकनाथजी शिंदेंना मत आहे तेव्हा ही लढाई जिंकण्यासाठी हातात पडेल त्या साधनाचा वापर करून काँग्रेसला चारी मुंड्याचित करण्यासाठी शिवसैनिकांनी जिद्दीने जोमाने कामाला लागावे असे आवाहन केले.

गेल्या वीस वर्षापासून गोरगरीब सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लातूर ग्रामीण मतदारसंघात प्रस्थापिता विरुद्ध सातत्याने संघर्ष करीत आहे धनदांडग्याविरुद्ध लढत आहे. शेतकरी शेतमजूर सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला मला मिळालेल्या आमदारकीच्या माध्यमातून गावागावात विकास कामांना कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून आणला अनेक कामांना गती दिली असे सांगून महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून कार्यक्षम मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळाला. त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले असून शिंदे साहेबांना पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बसविण्यासाठी शिवसैनिकांनी जिद्दीने काम करून लातूर ग्रामीण मतदार संघात महायुतीच्या विजयासाठी जिकरीचे प्रयत्न करावेत. आपला विश्वास निश्चितपणे येणाऱ्या काळात सार्थक ठरेल असे बोलून दाखविले.

प्रारंभी जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेवर पुन्हा एकदा भगवा फडकविण्यासाठी आमदार रमेश आप्पा कराड निवडून येणे खूप गरजेचे आहे असे सांगून त्यांच्या विजयात शिवसैनिकांचे निश्चितपणे मोठे योगदान राहील असे बोलून दाखविले. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील शिवसेनेचे आणि विविध आघाडीचे प्रमुख पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मतदान यंत्रांचे दुसरे सरमिसळीकरण पूर्ण

### मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांचे क्रमांक झाले निश्चित

लातूर :– विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातील २ हजार १४२ मतदान केंद्र आणि १ सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी आवश्यक मतदान यंत्रांचे दुसरे सरमिसळीकरण आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झाले. यामध्ये मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांचे क्रमांक निश्चित झाले. भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले सामान्य निवडणूक निरीक्षक डॉ. करुणा कुमारी, लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रधान, साकेत मालवीया, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, मतदान यंत्र व्यवस्थापन कक्षाच्या नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी प्रदीप डूमणे, नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांच्यासह जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवार, तसेच उमेदवारांचे आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या दिशानिर्देशानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी मतदान केंद्रांच्या २० टक्के अतिरिक्त बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट आणि ३० टक्के अतिरिक्त व्हीव्हीपॅट मशीन देण्यात आल्या आहेत. तसेच लातूर ग्रामीण, लातूर शहर, अहमदपूर आणि औसा मतदारसंघात उमेदवारांची संख्या जास्त असल्याने प्रत्येक मतदान केंद्रांवर २ बॅलेट युनिट लावण्यात येणार असल्याने त्या प्रमाणात बॅलेट युनिटचे वितरण करण्यात आले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ३६३ मतदान केंद्रांसाठी ८७० बॅलेट युनिट, ४३५ कंट्रोल युनिट आणि ४७१ व्हीव्हीपॅट मशीन, लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील ३८८ मतदान केंद्र आणि १ सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी ९३२ बॅलेट युनिट, ४६६ कंट्रोल युनिट आणि ५०५ व्हीव्हीपॅट मशीन, अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील ३७६ मतदान केंद्रांसाठी ९०२ बॅलेट युनिट, ४५१ कंट्रोल युनिट आणि ४८८ व्हीव्हीपॅट



मशीन, उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघातील ३५९ मतदान केंद्रांसाठी ४३० बॅलेट युनिट, ४३० कंट्रोल युनिट आणि ४६६ व्हीव्हीपॅट मशीन, निलंगा विधानसभा मतदारसंघातील ३४७ मतदान केंद्रांसाठी ४१६ बॅलेट युनिट, ४१६ कंट्रोल युनिट आणि ४५१ व्हीव्हीपॅट मशीन आणि औसा विधानसभा मतदारसंघातील ३०९ मतदान केंद्रांसाठी ७४० बॅलेट युनिट, ३७० कंट्रोल युनिट आणि ४०१ व्हीव्हीपॅट मशीन वितरीत करण्यात आल्या आहेत. मतदान यंत्रांच्या दुसऱ्या सरमिसळीकरणानंतर कोणत्या क्रमांकाचे बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट मशीन कोणत्या मतदान केंद्रावर जाणार आहे, ही निश्चित झाले आहे. या सरमिसळीकरण प्रक्रीयेबाबत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी सर्व उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यांना माहिती दिली. तसेच त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे समाधान केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE